**मतांतरे**

# प्रश्न तात्त्विक धारणांचा


## विद्युत भागवत व दीपक कसाळे


परिवर्तनाचा वाटसरूच्या १६ ते ३१ मे २०१८ च्या अंकात जयंत लेले यांचा 'राजकारण आणि आंबेडकरवाद' हा महत्त्वाचा लेख प्रसिद्ध झाला आहे. जयंत लेले हे कॅनडामधील किंगस्टन विद्यापीठातून प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले. महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील सिन्नर सारख्या ठिकाणी जन्म व बालपण गेलेले जयंत लेले महाराष्ट्रापेक्षा अत्यंत विपरीत हवामान असलेल्या किंगस्टनसारख्या विद्यापीठात नोकरीच्या निमित्ताने गेले आणि वैचारिक क्षेत्रात स्थिरपणे काम करत त्यांनी महाराष्ट्रातील राजकारण, समाजकारण व अर्थकारणासंदर्भात अत्यंत मौलिक असे वैचारिक योगदान केले. १९७० ते आजतागायत जयंत लेले हे सातत्याने महाराष्ट्राच्या राजकीय अर्थकारणाबद्दल चिकित्सक लेखन करत असून विशेषत: वारकरी संप्रदायाच्या अभ्यासानंतर त्यांनी ब्राह्मण आणि मराठा या दोन जात-गटांच्या एकत्र येण्यातून महाराष्ट्रातील सत्ता-समतोलाची जडण-घडण उकलली आहे.

जात-लिंगभावासंदर्भात घडत गेलेल्या सजगदृष्टीच्या पार्श्वभूमित सिद्धांकनाच्या पातळीवर माफुआं आणि नंतर सौत्रांतिक मार्क्सवादाची मांडणी करणारे शरद पाटील, शेतकरी संघटना उभारताना समग्र महिला आघाडीचा प्रयोग करू पाहणारे शरद जोशी यांचे प्रयत्न जसे महत्त्वाचे होते तसेच जयंत लेले यांचेही प्रयत्न महत्त्वाचे वाटतात. वारकरी संप्रदायाला मृत ओझे मानू नये आणि भक्तीतील मोक्षदायी सुप्त शक्ती परिवर्तनाच्या संदर्भात पाहणारी त्यांची मांडणी आजच्या संदर्भातही निश्चितच महत्त्वाची वाटते. त्यामुळेच आंबेडकरवादाच्या समकालीन संदर्भातील पुनर्वाचनाचा प्रयत्न असलेल्या त्यांच्या मांडणीला प्रतिसाद देणे आवश्यक वाटते.

आंबेडकवादाचे पुनर्वाचन ते ज्या संदर्भात करू पहात आहेत तो जात-वर्ग-लिंगभावाच्या गुंतागुतीचा आहे हे स्पष्टच आहे. मग जातीप्रश्न आणि लिंगभावाच्या अनुषंगाने आंबेडकरवादाचा मुक्तीगामी अन्वयार्थ लावणाऱ्या गेल ऑमवेट, एलिनॉर झेलिऐट, प्रतिमा परदेशी, शर्मिला रेगे, विद्युत भागवत, उमेश बगाडे आदींच्या वैचारिक योगदानाची दखल घेणेही आंबेडकरवादाचे पुनर्वाचन करताना गरजेचे ठरेल असे वाटते. परंतु ह्याचा अर्थ कुणाची दखल घेतली किंवा कुणाची नाही घेतली हा मुद्दा नाही. मुद्दा आहे समकालीन संदर्भातील प्रवाही तात्त्विक धारणांचा.

काँग्रेसच्या स्वातंत्र्य लढ्याबद्दल आंबेडकर साशंक असूनही स्वातंत्र्यपूर्व काळात आणि नंतर सरकारमध्ये सहभागी झाले. त्यांनी


विद्युत भागवत या स्त्री-प्रश्नाच्या अभ्यासक आहेत. दीपक कसाळे हे सामाजिक चळवळीत सक्रीय आहेत.

ईमेल – vidyutbhagwat@gmail.com
dniipmuu30@gmail.com

परिवर्तनाचा वाटसरूच्या १६ ते ३१ मे २०१८ च्या अंकात जयंत लेले यांचा 'राजकारण आणि आंबेडकरवाद' हा महत्त्वाचा लेख प्रसिद्ध झाला आहे. जयंत लेले हे कॅनडामधील किंगस्टन विद्यापीठातून प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले. महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील सिन्नर सारख्या ठिकाणी जन्म व बालपण गेलेले जयंत लेले महाराष्ट्रापेक्षा अत्यंत विपरीत हवामान असलेल्या किंगस्टनसारख्या विद्यापीठात नोकरीच्या निमित्ताने गेले आणि वैचारिक क्षेत्रात स्थिरपणे काम करत त्यांनी महाराष्ट्रातील राजकारण, समाजकारण व अर्थकारणासंदर्भात अत्यंत मौलिक असे वैचारिक योगदान केले. १९७० ते आजतागायत जयंत लेले हे सातत्याने महाराष्ट्राच्या राजकीय अर्थकारणाबद्दल चिकित्सक लेखन करत असून विशेषत: वारकरी संप्रदायाच्या अभ्यासानंतर त्यांनी ब्राह्मण आणि मराठा या दोन जात-गटांच्या एकत्र येण्यातून महाराष्ट्रातील सत्ता-समतोलाची जडण-घडण उकलली आहे.

जात-लिंगभावासंदर्भात घडत गेलेल्या सजगदृष्टीच्या पार्श्वभूमित सिद्धांकनाच्या पातळीवर माफुआं आणि नंतर सौत्रांतिक मार्क्सवादाची मांडणी करणारे शरद पाटील, शेतकरी संघटना उभारताना समग्र महिला आघाडीचा प्रयोग करू पाहणारे शरद जोशी यांचे प्रयत्न जसे महत्त्वाचे होते तसेच जयंत लेले यांचेही प्रयत्न महत्त्वाचे वाटतात. वारकरी संप्रदायाला मृत ओझे मानू नये आणि भक्तीतील मोक्षदायी सुप्त शक्ती परिवर्तनाच्या संदर्भात पाहणारी त्यांची मांडणी आजच्या संदर्भातही निश्चितच महत्त्वाची वाटते. त्यामुळेच आंबेडकरवादाच्या समकालीन संदर्भातील पुनर्वाचनाचा प्रयत्न असलेल्या त्यांच्या मांडणीला प्रतिसाद देणे आवश्यक वाटते.

आंबेडकवादाचे पुनर्वाचन ते ज्या संदर्भात करू पहात आहेत तो जात-वर्ग-लिंगभावाच्या गुंतागुतीचा आहे हे स्पष्टच आहे. मग जातीप्रश्न आणि लिंगभावाच्या अनुषंगाने आंबेडकरवादाचा मुक्तीगामी अन्वयार्थ लावणाऱ्या गेल ऑमवेट, एलिनॉर झेलिऐट, प्रतिमा परदेशी, शर्मिला रेगे, विद्युत भागवत, उमेश बगाडे आदींच्या वैचारिक योगदानाची दखल घेणेही आंबेडकरवादाचे पुनर्वाचन करताना गरजेचे ठरेल असे वाटते. परंतु ह्याचा अर्थ कुणाची दखल घेतली किंवा कुणाची नाही घेतली हा मुद्दा नाही. मुद्दा आहे समकालीन संदर्भातील प्रवाही तात्त्विक धारणांचा.

कॉंग्रेसच्या स्वातंत्र्य लढ्याबद्दल आंबेडकर साशंक असूनही स्वातंत्र्यपूर्व काळात आणि नंतर सरकारमध्ये सहभागी झाले. त्यांनी बरीच महत्त्वाची जबाबदारीही पार पाडली पण १९४२ ते १९४७ चा काळ धामधुमीचा असल्याने फारसा विचार न करताच निर्णय घ्यावे लागले असा एक विचारप्रवाह आहे आणि त्यात बरेच तथ्य असल्याचे जयंत लेले यांचेही मत आहे. त्यांच्या मते, त्या मागील एक दुर्लक्षित कारण १९३० नंतर मंदीतून अमेरिकेच्या नेतृत्वात वाट काढताना कल्याणकारी चेहरा धारण करत विस्तारणाऱ्या भांडवलशाहीने काही आशादायी चित्र निर्माण केले. परिणामी समाजवादी समाजव्यवस्थेत भांडवलशाहीचे रूपांतर हिंसक क्रांतीशिवाय होईल अशी अपेक्षा काही साम्यवादी बुद्धिवंतही व्यक्त करू लागले. अशा पार्श्वभूमीवर आंबेडकरांची भारताच्या उदारमतवादी, औपचारिक लोकशाही शासनाशी तडजोड समजण्यासारखी पण शेवटी भ्रमनिरासाकडे जाणारी ठरली.

जयंत लेले यांच्या उपरोक्त विश्लेषणाच्या संदर्भात एक प्रश्न उपस्थित करणे महत्त्वाचे ठरेल. तो प्रश्न हा, की स्वातंत्र्य लढ्यासंदर्भातील धामधूम आणि त्यानंतरच्या भांडवलशाहीने काहीएक आशादायी चित्र निर्माण केलेले असताना समकालीन परिस्थितीकडे चिकित्सकपणे पाहण्यासाठी आंबेडकरांना बरोबरीचे सहकारी होते का? आणि नव्हते तर का नव्हते? हा प्रश्न केवळ आंबेडकरवादाच्या पुनर्वाचनासंदर्भात महत्त्वाचा नसून मार्क्सवादाच्या पुनर्वाचनासंदर्भातही महत्त्वाचा ठरेल.

आंबेडकरांच्या राजकारणाचा परिणाम म्हणून दलित समूह मोठ्या प्रमाणात शहरात स्थलांतरित झाला आणि गाव-खेड्यातील अलुतेदारी-बलुतेदारीला धक्के बसले. शहरात श्रमिक होऊन दलितांनी नवे व्यक्तीत्व धारण करण्याची प्रक्रिया घडली आणि अगदी राष्ट्रध्वज आणि स्वातंत्र्यालाही पुन्हा पुन्हा प्रश्नांकित केले गेले. अविभक्त हिंदू कुटुंब या चौकटीला स्त्रियांच्या संपत्तीतील अधिकाराच्या मांडणीने संरचनात्मक पातळीवर धक्के देणारी राजकीय प्रक्रिया प्रवाही झाली. त्याबद्दल काही स्त्रिवादी अभ्यासकांनी महत्त्वाची मांडणी केली. प्रतिमा परदेशी यांनी 'स्त्री ही जातीव्यवस्थेचे प्रवेशद्वार असल्याच्या'[१] आंबेडकरवादाच्या गाभातत्त्वाला अधोरेखित केले (परदेशी, ११९६). त्यामुळे जात-लिंगभावाच्या सहअस्तित्वाची मूलगामी दृष्टी प्रस्तुत झाली. त्या पार्श्वभूमिवर शर्मिला रेगे यांनी जात आणि लिंगभावाच्या संदर्भात आंबेडकरांचे पुनर्वाचन केले. जात आणि लिंगभावाबद्दल बाबासाहेबांच्या विचारात दिसणारी एकात्मता रेगे यांनी अधोरेखीत केली (रेगे, २०१३).

तर कॅनडामध्ये स्त्रीवादी पक्षाची स्थापना करण्यात कृतीशील असणाऱ्या मेरी ओ'ब्रायन यांनी, उत्पादन आणि पुनरुत्पादन या संकल्पनांचा विचार मार्क्सवादात पुरुषी चौकटीत झाल्याची टीका केली. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात घडलेल्या घटना पाहून त्या हादरल्या. विशेषत: हंगेरीवरील आक्रमणाच्या संदर्भात त्यांच्या लक्षात आले की, रशियन राजवटी मागे असलेल्या 'विचारांच्या कौर्यात' मानवी अनुभवातील मातृत्व तुडवले गेले, दुर्लक्षित केले गेले, बिनमहत्त्वाचे ठरवले गेले. याचे कारण त्यांच्या मते मार्क्सवादातील पुनउत्पादनाविषयीच्या अज्ञानात आहे. पुनरुत्पादनाचा मेरी ओ'ब्रायन द्वंद्वात्मक पद्धतीने विचार करतात. सिमॉनपासून झालेली स्त्रीवादाच्या मांडणीची दखल घेत त्या सार्वजनिक आणि खाजगी, सर्जनशीलता आणि जननक्षमता, उत्पादन आणि पुनरुत्पादन, परात्मता आणि एकात्मता आदींच्या विभाजनाचा लिंगभावाच्या चौकटीत चिकित्सकपणे विचार करतात.

त्या म्हणतात, आता मूल जन्माला घालणे ही एक 'आरोग्य उद्योगाची' बाब झाली आहे. प्रसूतीतज्ज्ञ उद्योजक- तेही बऱ्याचवेळा पुरुषच असलेल्यांच्या अध्यक्षतेखाली हॉस्पिटल नावाचा अपरिहार्य प्रसंग बाईला अनुभवावा लागतो. अशा हॉस्पिटलमध्ये कर्तेपणा असलेली बाई एका अर्थी रुग्ण म्हणून माणूसपणापासून दुरावण्याच्या परिस्थितीत जाते. नव्या जिवाला जन्म देतानाची स्त्रियांना एकत्र आणणारी सामाजिकता गायब केली जाते... परंतु त्याचा अर्थ इतकाच, की आताच्या काळात पुनरुत्पादन वस्तूच्या उत्पादनासारखे बनते. पुनरुत्पादनाचे सामाजिक संबंध संपत्तीच्या संबंधात रूपांतरीत होतात आणि भांडवलीशाही समाजात पुरुषी वर्चस्वाची परिस्थिती विशिष्ट असे प्रारूप धारण करते. यातून आर्थिकतेशी जोडता येतील असे पुनरुत्पादनाचे सामाजिक संबंध सांस्कृतिक स्वरूपात दिसत असले तरी केवळ वर्गीय विश्लेषणातून पुरुषी वर्चस्वाचे मूळ स्वरूप आणि वास्तव लक्षात येत नाही.

मेरी ओ'ब्रायन दाखवून देतात की, श्रम करणारे आणि श्रम न करणारे अशा वर्गांची विभागणी केली जाते तेव्हाच पुनरुत्पादनाच्या संबंधांचा विचार करणे गरजेचे ठरते. बाळंतपणाच्या कळांपासूनचे सर्व श्रम स्त्रिया करतात. उत्पादक आणि पुनरुत्पादक श्रमांकडे वेगवेगळ्या दृष्टीकोनातून पाहिले तर त्यात लिंगभावात्मक विचार केला जात नाही. म्हणजेच मूल जन्माला घालणे नैसर्गिक आणि सार्वजनिक जीवनातील उत्पादक श्रम मात्र मानवी निर्मिती अशी गल्लत होते. त्यातून लिंगभावात्मक संघर्षाकडे डोळेझाक करणारी, पुरुषी वर्चस्वासाठी आवश्यक असणारी एक ऐतिहासिक प्रक्रिया घडते आणि तिच्यात स्त्रीत्वाचे खाजगीकरण होत जाते. उत्पादन आणि पुनरुत्पादनाचे संबंध हे उतरंडीच्या स्वरूपात रचले जातात. म्हणजेच मार्क्सला सार्वजनिक आणि खाजगी जीवनाच्या विभेदनात फक्त आर्थिक चौकट दिसते. परंतु, व्यक्तीचा जन्म कुणाच्या

तरी शरीरातून झाल्याचा विचारच होत नाही आणि व्यक्तीची मृत्यूपर्यंत होणारी वाटचाल मात्र अनंत मर्यादांना पार करून पलिकडे जाणाऱ्या अनाकलनीय रूपात पाहिली जाते. थोडक्यात पुरुषांच्या तत्त्वज्ञानात्मक कल्पनेला मृत्यू या कल्पनेने पछाडलेले दिसते. परिणामी मानवी पुनरुत्पादनाची प्रक्रिया मुळात तत्त्वज्ञानाच्या चौकटीत उपेक्षिलेली आणि लिंगभावाच्या दृष्टीने विषम स्वरूपात मांडली गेलेली दिसते (ओ'ब्रायन, १९८३).

अशाप्रकारे मार्क्सवादासारख्या राजकीय सिद्धांतालाही पुरुषी श्रेष्ठत्वाचे परिमाण धारण होते आणि त्यातून अपरिहार्यपणे येणारा एकेरीपणा ओलांडण्याची सैद्धांतिक धडपड मेरी ओ'ब्रायन करतात. त्यांच्या मांडणीचे महत्त्व अधोरेखित करणारे एक उदाहरण इथे देणे गरजेचे ठरेल. त्या म्हणतात, मानवी जीवनातील पहिला ऐतिहासिक लक्षणीय बदल जीवशास्त्रीय उच्छेदनातून नाही तर पुनरुत्पादनाच्या जाणीवेतील परिवर्तनाने झाला आणि ती जाणीव शारीरिक पितृत्वाच्या ऐतिहासिक शोधाने बदलली (ओ'ब्रायन, १९८३). स्त्रीवादी चर्चाविश्वात श्रम व लैंगिकते संदर्भातही मार्क्सवादाची लिंगभावी दृष्टीच्या अभावातील मर्यादा अधोरेखीत केली आहे.[२]

भारतीय प्राचीन इतिहाससंदर्भातील शरद पाटील यांच्या मांडणीच्या आधारे मेरी ओ'ब्रायन यांच्या वरील मताशी मतभेद येऊ शकतो. आपण असे म्हणू शकतो की, पुनरुत्पादनाच्या जाणीवेतील परिवर्तन शारीरिक मातृत्वाच्या ऐतिहासिक शोधाने झाले आणि त्या अर्थाने मानवी जीवनातील पहिला ऐतिहासिक लक्षणीय बदल मातृसत्तेच्या रूपात झाला. पण हा मुद्दा ऐतिहासिक तथ्यांच्या तपशीलाचा असून आपल्या दृष्टीने प्रश्न आहे तो मार्क्सवादाच्या ऐकेरीपणाचा आणि त्यासंदर्भात मेरी ओ'ब्रायन आणि शरद पाटील यांच्या सूत्रात नाळेचे नाते दिसते.

अर्थात जयंत लेले यांच्या मांडणीत वर्गीय दृष्टीलाच अतिरेकी महत्त्व देणारी मर्यादा उल्लंघीलेली दिसत असली तरी वर्गेतर जात-पितृसत्तेसारख्या शोषण-शासनाच्या व्यवस्थांच्या ऐतिहासिक व गुंतागुंतीच्या सहअस्तित्वाची दखल घेणारी बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवाद ही पद्धती म्हणून स्वीकारल्याचे दिसत नाही.

उदारमतवादी औपचारिक लोकशाहीच्या गाभ्यात कायम राहिलेल्या ब्राह्मणी प्रभुत्वाच्या ऐतिहासिक प्रक्रियेचा आढावा घेताना जयंत लेले सांस्कृतिक मूलतत्त्ववाद आणि आर्थिक मूलतत्त्ववाद अशा दोन स्वतंत्र उपशिर्षकांद्वारे चर्चा करतात. त्यांच्यामते, आजच्या भारतीय संदर्भातील मूलतत्त्ववादाच्या आव्हानाचे प्रमुख कारण हे, की ९० नंतर भांडवलशाहीच्या आर्थिक अरिष्टाच्या पार्श्वभूमीवर उभ्या राहिलेल्या आंदोलनांच्या नेतृत्वाने ढासळत्या अर्थव्यवस्थेची सखोल कारणमीमांसा करण्याऐवजी व्यक्तीनिष्ठ विरोध केला हेही आहे.

भारतीय संदर्भातील ऐतिहासिक परिस्थिती लिंगभावी वर्ण, जात, वर्ग संरचनांनी घडत-बदलत गेलेल्या गुंतागुंतीच्या स्वरूपात पहावी लागते. त्यामुळे ९० नंतरच्या आर्थिक अरिष्टाच्या सखोल कारणमीमांसेतून जात-लिंगभावाचा मुद्दा वेगळा असू शकत नाही. तसे केले तर- टाटा ते अंबानी यांचे मागील लोकसभा निवडणुकीत मोदीच्या पाठीशी उभे राहणे, रामदेव बाबांच्या पतंजली उद्योगाची अकल्पनीय भरभराट, हाताने मानवी विष्टा साफ करणाऱ्या कामगारांची वाढलेली संख्या, दिवाळीतील बलीप्रदेला लक्ष्मीपूजनावर करोडो रुपये खर्च करणारे बनीया-ब्राह्मण भांडवलदार आणि त्यांचा 'पवित्र नफा' ('शुभ लाभ'), जाहिरातीतील बाईच्या वस्तुकरणासोबतच बाईच्या पावित्र्याची, शुद्धीची ब्राह्मणी कल्पना वस्तुंवरही आरोपीत करणाऱ्या प्रक्रियांचा अर्थ कसा लावणार?

अर्थात जयंत लेले यांनी ब्राह्मणी-भांडवली सामायिक पाया लक्षात घेतलेला नाही असे नाही. परंतु तोच सामायिक पाया खऱ्याअर्थाने हिंदुत्ववादी मूलतत्त्ववादाला पोषक होता हा सूक्ष्म भेद त्यांनी लक्षात घेतल्याचे

दिसत नाही. भारतीय संदर्भातील ब्राह्मो फॅसिझमचा उभा राहिलेला धोका केवळ भांडवलशाहीत निर्माण झालेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीत पाहता येणार नाही.

उदारमतवादातील व्यक्तीस्वातंत्र्य माणसाच्या नैसर्गिक स्वातंत्र्याला नाकारणारे असले तरी भारतीय संदर्भातील जाती-जमातींच्या स्वायत्त समाजरचनेतील व्यक्तीसंकोच, त्याचा उदारमतवादी व्यक्तीस्वातंत्र्याशी झालेला व्याघात आणि त्यातून 'आधुनिक' व्यक्ती न झालेली पण जाती उतरंडीतील श्रेष्ठत्वाचे दावे करणारी 'व्यक्तीवादी' पुरुषी शरीरे, शहरांतही थोड्याफार वेगळ्या स्वरूपात गणपती मंडळे ते कार्पोरेट्ससारख्या आधुनिक रचनांद्वारे पुनर्निर्मित होत राहिलेले जात-लिंगभावी समाजवास्तवात, आणि त्यातच 'आपल्या'ही कातडीच्या आत मुरत आलेली ब्राह्मो-भांडवली फॅसिझमची पूर्वतयारी! एका अर्थाने या ब्राह्मणी-भांडवलीकरणाच्या प्रक्रियेने, परंपरेतील समतावादी राजकारणास पूरक असलेले अवकाशही बाधीत केले आहेत. हा पेच लिंगभाव नाकारून एकेरी वर्गीय अन्वेषण पद्धतीने समजून घेता येणार नाही.

विशेषत: डाव्या राजकारणाच्या पडझडीनंतर 'आपले' काहीतरी चुकलेच याची झालेली जाणीव तात्त्विक धारणांच्या उलट तपासणीपर्यंत अजूनही जाताना दिसत नाही. त्यामुळे अपराधभावाच्या चौकटीत डावे काहीतरी स्पष्टीकरणे देत असल्याचेच दिसून येते. रावसाहेब कसबे यांच्या 'मार्क्स आणि आंबेडकर' या ग्रंथाचे माकपचे नेते य. कोल्हटकर यांनी १५ सप्टेंबर १९८५ च्या 'जीवनमार्ग'मध्ये पुस्तक परीक्षण केले. त्यात ते म्हणतात, रावसाहेब कसबे यांनी भारतातील कम्युनिस्टांवर कर्मठपणाचा, एकांगीपणाचा, अर्थवादाच्या आहारी जाण्याचा आरोप केलेला आहे. पण ते खरे नाही. जातिप्रथेविरुद्ध लढण्याबाबत कम्युनिस्टाच्या मूलभूत चुका झालेल्याच नाहीत. अलीकडेच झालेल्या जेएनयुच्या आंदोलनानंतर जेएनयु विद्यापीठात झालेल्या विद्यार्थी प्रतिनिधींच्या निवडणुकांमध्ये दलित विद्यार्थ्यांनी कम्युनिस्टांबद्दल अत्यंत कडवी भूमिका घेतली. त्यावर धक्का बसलेले अनेक कम्युनिस्ट कार्यकर्ते म्हणत होते, की 'कम्युनिस्टांनी दलितांसाठी इतके केले आणि तरी 'ते' कम्युनिस्टांना शत्रू का मानत आहेत?' अलिकडेच सीपीआय (एम)चे सरचिटणीस सिताराम येचुरी यांच्या इंडियन एक्सप्रेसमध्ये प्रसिद्ध झालेल्या मुलाखतीत त्यांना मुलाखतकाराने विचारले, की जातीप्रश्नावर कम्युनिस्टांनी फारसे काही केले नाही हे डाव्यांच्या पराभवाचे कारण आहे का? त्यावर येचुरी यांनी दिलेले उत्तरही तसेच आहे. कम्युनिस्टांनी जातीप्रश्नावर कृती केल्याचे दाखलेच ते पुन्हा पुन्हा देत राहतात. पण जातीप्रश्नाच्या संदर्भातील मार्क्सवादाच्या तात्त्वीक धारणेची मर्यादा ओलांडण्याचा दुराग्रह काही सोडायला ते तयार आहेत असे दिसत नाही.

लिंगभावी जात-वर्गीय असे बहुपेडी वास्तव प्रॅक्सिसच्या पातळीवर तात्त्वीक धारणेप्रत न विस्तारण्याची मर्यादा हे आकसणारे पुरोगामी राजकारण, पक्ष-संघटनांच्या दोषयुक्त रचना, नेतृत्वाच्या जीवघेण्या स्पर्धा, गटा-तटांचे अटीतटीचे संघर्ष आदींच्या बुडाशीचे कारण राहिलेले आहे.

कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या १९२१ साली भरलेल्या तिसऱ्या संमेलनात कम्युनिस्ट पक्षाच्या संरचनेबद्दलचे गाईडलाईन प्रसिद्ध केले आहे. त्यात कम्युनिस्ट पक्ष म्हणजे काय? पक्षाचा ढाचा, उद्दिष्ट आणि नेतृत्वाबद्दलची चर्चा केलेली आहे. त्यात ज्या त्या देशांच्या इतिहासक्रमात निर्धारित झालेल्या वैशिष्ट्यांनुसार पक्षाच्या रचनेतील वेगळेपणाची गरज अधोरेखित केलेली आहे. पक्ष नेतृत्वात एकमेकांशी जैवपणे बांधलेल्या सेंट्रल 'बॉडी'ची कल्पना आहे आणि तिची जैवबांधणी 'डेमॉक्रॅटिक सेंट्रलिझम'द्वारे करता येईल अशी मांडणी आहे. औपचारिक लोकशाही आणि सत्तेच्या केंद्रिकरण या दोन्ही टोकांना नकार देणारे हे 'ग्रेट थिसीस' मानले गेले. पण त्याद्वारे सामुदायीक कृतींचे बळकटीकरण होत लढाऊ शक्ती म्हणून विकसित

होता आले नाही तर 'डेमॉक्रॅटिक सेंट्रलिझम'चे रूपांतर 'ब्युरॉक्रॅटिक सेंट्रलायझेशन'मध्ये होण्याची भीतीही व्यक्त केली आहे. परंतु, तरीही त्या 'डेमॉक्रॅटिक सेट्रलिझम'मध्ये समुहाच्या लोकशाहीचा गळा का घोटला गेला? त्यात औपचारिक लोकशाहीच्या पलिकडचा अर्थ अभिप्रेत असतानाही पक्षरचनेची यंत्रणा औपचारिकच का राहिली? असा प्रश्न अमेरिकेतील ब्लॅक रोज अनार्किस्ट फेडरेशनने उपस्थित केला आहे. त्यांच्या मते, क्रांतीचा प्रश्न पक्ष-संघटनेपेक्षाही महत्त्वाचा आहे. कारण हा मुद्दा केवळ पक्ष-संघटनेच्या पुनर्रबांधणीचा नसून 'आपल्या' राजकीय प्रश्नांच्या सोडवणुकीचा आहे. ग्राम्सीच्या प्रभावात लोकशाही मध्यवर्तीत्वाकडे ते लोकसंख्येचे मध्यवर्तीत्व म्हणून पहात नाहीत, तर संस्थात्मक वैशिष्ट्ये म्हणून निर्णय घेण्याची ही प्रक्रिया ऐतिहासिकदृष्ट्या कशी घडत गेली, कशी आकार घेत गेली हे तपासणे त्यांना महत्त्वाचे वाटते (blackrose fed.org या संकेत स्थळावरून).

भारतीय संदर्भात लोकशाही मध्यवर्तीत्वाचे प्रारूप जसेच्या तसे आयात केले गेले. परिणामी लिंगभावी जात-वर्गीय समाजवास्तवाच्या इतिहासक्रमात निर्धारित झालेली वैशिष्ट्ये संरचनात्मक सक्ती बनून संघटनात्मक व्यवहारातही मुरत राहिली. पुरोगामी पक्ष-संघटनांच्या औपचारिक लोकशाहीच्या संरचनांमध्ये नेतृत्वांच्याही पितृसत्ताक जाणिवांचे स्वसंस्करण झाले नाही. डी-कास्ट, डी-जेंडर झाल्याचे व्यक्तीगत पातळीवरील आभास होत राहिले. परंतु पक्ष-संघटनांचे खोलातील पितृसत्ताक गाभे संवाद प्रक्रियेचा संकोच करत राहिले आणि अशा अरिष्टग्रस्त साधनाद्वारे आर्थिक-सांस्कृतिक मूलतत्त्ववादी महाव्याधींशी 'ते' समतेच्या बाजूचा राजकीय संघर्ष करू पाहताहेत. एकाअर्थी उद्देशाशीच विसंगत आंतरीकरणाने ते क्षीण होत गेले आहेत. डाव्या राजकारणाची ही विसंगती त्याचा पुरुषी आग्रही गाभा (Masculine Dogmatic Kernel) म्हणूनही पाहता येऊ शकतो.

अगदी भाषाशास्त्रीय आणि संकल्पनात्मक शब्दसंग्रहाच्या व्यापक समस्येतून या पेचाचे खोल असे आंतरीकरण होत गेले आहे. त्यातून पुरुषी वर्चस्वाच्या दुराग्रही मतांनी सर्व मानवी संस्थांना आणि चर्चाविश्वांच्या पद्धतींना व्यापून टाकले आहे. खाजगी आणि सार्वजनिक किंवा बंधुभाव यासारख्या सहज वापरल्या जाणाऱ्या शब्दांच्या उदाहरणांद्वारे पारंपरिक राजकीय सिद्धांतनात सापडणारी पुरुषी वर्चस्वाची विचारप्रणाली कशी अभिव्यक्त होते हे मेरी ओ'ब्रायन सूक्ष्मपणे टिपतात. त्यामुळे विश्वबंधुत्वाची आपण कितीही वैश्वीक व्याख्या केली तरी स्त्रियांना त्यांचा अनुभव त्या राजकीय प्रक्रियेपासून उपरेच करतो!

शरद पाटील यांनी केलेल्या भारतीय संदर्भातील इतिहास लेखनाच्या आधारे राजकुमार घोगरे त्यांच्या फेसबुक वॉलवर लिहितात, 'भ्रातृ पासून भाऊ आणि भ्रातृव्य पासून भाऊबंदकी म्हणजे पहिल्या पिढीतील चुलतभावापासून वैर असा अर्थ होतो. प्राचीन साहित्यात भ्रातृव्य या शब्दाबरोबर स्वसृव्य म्हणजे बहिणबंदकी हा शब्द सापडत नाही. पितृसत्ताक व्यवस्थांमध्ये पिढी दर पिढी साधनसंपत्तीचा ऱ्हास होत जातो आणि सोबतच भाऊबंदकीतला वैरभावही वाढत जातो. आजच्या जाती-पितृसत्ताक संरचनेत हा वैरभाव सामाजिक-आर्थिक सर्वहारांची सामूहिकता घडू देत नाही. त्यातून त्यांच्यावर लादल्या गेलेल्या व्यवस्थेला नाकारण्याची क्षमता ते हरवून बसले आहेत. जात-पितृसत्ताक व्यवहार आणि संस्कारांनी त्यांच्या जाणिवा स्त्रीवर्गाविषयी कमालीच्या अनाकलनीय झाल्या आहेत. स्त्रीवर्गाविषयी त्यांच्या भावना एकतर आत्यंतिक वर्चस्ववादी असतात किंवा कमालीच्या भावूक असतात, परंतु व्यवहारिक नसतात.' त्यामुळे चळवळीतील अवकाशात सार्वजनिक एकात्मतेतून जो बंधुभाव घडतो तो अपरिहार्यपणे पुरुषांचा बंधुभाव असतो (घोगरे, २०१८).

चळवळीत आवश्यक असलेल्या लोकशाही अवकाशांच्या दृष्टीने हा पेच समजून घेणे खूप गरजेचे

आहे. भारतीय गणसमाजातील द्विज वर्णाची समुहाधिष्ठीत लोकशाही आणि त्यातही द्विज वर्णातील स्त्रिया आणि कनिष्ठ पुरुषांचीही कुलमुख्याधीनता हे महत्त्वाचे वैशिष्ट्य राहिलेले आहे (पाटील, १९९३). जातीसमाजातील कुटुंबातील पित्याची सत्ता आणि ज्या-त्या जात-जमातीची स्वायत्त पितृसत्ता, परंतु वरिष्ठ जातीप्रमुखांच्या अधीनतेत घडलेली तिची एकपितृसंघीयता (बगाडे, २०१७) इतिहासक्रमात घडत आलेली पाहता येते. जात पितृसत्ता आणि एकपितृसंघीयतेची संरचनात्मक मर्यादा अगदी फुले-आंबेडकरी चळवळींनाही ग्रासून होती आणि आजचे डावे-पुरोगामी राजकारणही त्यापासून वाचलेले नाही. स्वातंत्र्योत्तर चळवळींचे स्वरूप हे बरेचसे 'एकखांबी तंबू' अशा स्वरूपाचे राहिले आहे. मोठ्या केडरबेस व शिस्तीच्या भासणाऱ्या पक्षांच्या व्यवहारातल्या ओळखीही अमक्याचा किंवा तमक्याचा गट अशाच आहेत.

भारतीय संदर्भातील समुहाधिष्ठीततेला ब्रिटिशांच्या हस्तक्षेपाने बाजारपेठेशी निगडीत अशा व्यक्तीस्वातंत्र्याचा आयाम प्राप्त झाला आणि व्यक्तीवाद हेही ब्राह्मणी पितृसत्तेचे एक वैशिष्ट्य बनले. अशात सध्याच्या सांस्कृतिक भांडवलशाहीच्या टप्प्यावर, एकसारख्या इच्छा-आकांक्षा असणाऱ्या 'यशस्वी' पुरुषत्वाच्या कल्पना अत्यंत आधुनिक अशा संस्थांत्मक पायावर एखाद्या वस्तूप्रमाणेच तयार केल्या जाऊ लागल्या आहेत (झिझेक, २०११). अशा गोंधळाच्या परिस्थितीचा आदमास घेताना 'सामाजिक माध्यमांद्वारे विश्वसनीय वाटणाऱ्या विचारवंतांनी व्यक्त केलेली मते मर्यादित स्वरूपात व्यक्तीगत अनुभवांच्या पलिकडे जाणारी ठरू शकतात. सुशिक्षित वर्गातील सार्वजनिक बुद्धिवंत आणि तळागाळात वावरणारे अनुभवी विचारवंत यांना एकत्र आणून नवविचार निर्मिती सामाजिक माध्यमांद्वारे होऊ शकते' असे जयंत लेले यांना वाटते आहे.

खरेतर सार्वजनिक बुद्धिवंत आणि अनुभवी विचारवंत या द्वैताच्या देवाण-घेवाणीतून नवविचार निर्मितीची कल्पना करणे म्हणजे विचार आणि कृतीच्या एकात्म प्रॅक्सिसला उतरंडीत उभे करणे ठरेल. मुक्तीगामी ज्ञानव्यवहार हा असे प्रस्थापित साचे आणि रूढ व्यवहार तोडूनच अधीक विस्तारू शकेल. परंतु त्यासाठी संवादाची केवळ आदर्शवादी कल्पना न करता संवादाच्या पेचाची व्यवस्थात्मक मुळे समजून घेत गतीशील पर्यायी (डायनेमिक अल्टरनेटिव्ह) व्यवहार घडवावे लागतील. त्यात 'इतरां'चे अस्तित्व मान्य करून त्यांचे म्हणणेही व्यवस्थित ऐकणे आणि सहभावनेतून प्रतिक्रिया देणे हे महत्त्वाचेच असेल. परंतु, 'कुणाच्या हेतूंवर शंका घेऊ नये' किंवा 'भाषा कशी असावी, कशी असू नये' वगैरे आदर्शांच्या कल्पना नुकसानकारकच ठरण्याच्या शक्यता अधिक आहेत.

या संदर्भात मेरी ओ'ब्रायन एक महत्त्वाचा खुलासा करतात. पुरुषांचे तत्त्वज्ञान हे पुरुषीच असल्याची त्या ठामपणे मांडणी करतात. विचारांविषयी विचार करण्याच्या मुद्दाला त्या संकल्पनात्मक पातळीवर महत्त्वाचे म्हणून पाहतात. त्या म्हणतात, विचार कितीही सर्जनशील आणि आडाखे बांधणारे असले तरी विचार करणाराचे विषयवस्तुशी जोडलेपण असते आणि काही प्रमाणात तुटलेपणही असते. जोडलेपणातून विचारांचे प्रतिनिधित्व प्रतिबिंबात्मक होत जाते आणि त्यातून अपलाप वा विपर्यास होण्याची शक्यता असते, तशीच नवी सर्जनशील समज घडण्याचीही असते. विपर्यास कुणी जाणीवपूर्वक करत नाही. विषयवस्तूपासून स्वतंत्र होताना विचार स्वत:ला मुक्त करत जातात. या प्रक्रियेत वस्तूविषयी अस्पष्ट असलेल्या सूक्ष्म छटा स्पष्ट होत जातात आणि या अर्थाने विचारप्रणालीची कृती सर्जनशील ठरू शकते. परंतु असे असले तरी विषयवस्तूविषयी विचार करणाराचे तुटलेपण हे आभासात्मकच असते. कारण विचारवंत दैनंदिन परिस्थितीपासून स्वतंत्र होऊ शकत नसतो (ओ'ब्रायन, १९८३).

थोडक्यात आपण असे म्हणू शकतो, की विचारवंताची

आभासात्मक तटस्थता उघड करणे हेही मुक्तीगामी ज्ञानव्यवहार विस्तारण्याच्या दृष्टीने कळीचे असते. त्यामुळे संवादाचा असा मोकळा अवकाश आपण सर्वांनीच स्वीकारला पाहिजे, की ज्यात हेतूंवरही शंका घेणे निषेधार्ह नसेल. निरपेक्ष, निर्वातात नसलेले विचारांचे विचार त्यातूनच अधिकाधीक मुक्तीगामी बनतील.

तात्त्वीक धारणेतील प्रवाहितता प्रागतीक राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाची असते आणि त्या संदर्भातील शरद पाटील यांचाही एक खुलासा इथे उदधृत करणे योग्य ठरेल. ते म्हणतात, 'भौतिक विज्ञानाच्या मन्वंतरकारी शोधातून आपल्या तत्त्वज्ञानात बदल होऊ शकतील- एवढेच नाही तर साम्यवादी समाजाच्या परिणतावस्थेत खुद्द तत्त्वज्ञानाचाच अंत होईल असे मार्क्सने आत्मनिरपेक्षपणे सांगितले आहे. पण तत्त्वज्ञानाचा असा अंत होईपर्यंत आपण असे म्हणू शकतो, की तो पर्यंतच्या भौतिक विज्ञानाच्या विकासातून मार्क्सचा अनित्यात्मक भौतिकवाद गैरलागू न ठरता भौतिक व चैतसिक विश्वाच्या नवनव्या साक्षात्कारांनी समृद्ध होत जाईल... मार्क्सवादी तत्त्वज्ञानातले बदल म्हणजे त्याला तत्त्वज्ञानाच्या मृत्यूकडे नेणाऱ्या विकासाच्या नवनव्या मजलांची प्रस्थाने ठरतील' (पाटील, १९९३). अशा व्यापक समजेवर आधारलेली संवादाची प्रक्रिया आंबेडकरवाद काय किंवा मार्क्सवाद काय- कुणाच्याही गाभ्याशीच्या तात्त्वीक धारणांच्या मर्यादा ओलांडणारी प्रस्थाने ठरतील, आणि प्रवाही वास्तवात त्या त्या विचारातील विपर्यास ओलांडून सत्याच्या अस्पष्ट छटा मुखर होत जातील. ●

**टीपा**

१ उमा चक्रवर्ती यांनी कमला गणेश यांच्या 'Wmen's Sclusion and the Structure of Caste' (1985) या पेपरच्या आधारे 'Conceptualising Brahmanical Patriarchy in Early India Gender, Caste, Class and State' या इपीडब्ल्यू ३ एप्रिल १९९३ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखात- स्त्रिया या जातीसंस्थेचे अस्तित्व टिकविण्याच्या दृष्टीने प्रवेशद्वार ठरतात हा मुद्दा अधोरेखित केलेला आहे.

२ मेरी ओब्रायन यांच्या The Politics of Repuroduction या ग्रंथातील निवडक मांडणीचा विद्युत भागवत यांनी स्वैर अनुवाद केला आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ यांनी, 'पुनरुत्पादन : द्वंद्वात्मक/सांस्कृतिक' या पुस्तकाच्या रूपात तो २००९ साली प्रसिद्ध केला आहे. या शिवाय वाचन साहित्य म्हणून मार्क्सवाद आणि स्त्रीवाद यांच्यातील विवादांची दखल घेऊन हायडी हार्टमन, शिला रोबोथोम, मेरी ओंब्रायन, सिमॉन दी बोव्हा अशा महत्त्वाच्या स्त्रीवादी विचारवंतांची दखल घेऊन मराठी व इंग्रजी भाषेत बरेचसे वाचन साहित्य तयार केले आहे. या कामात विद्युत भागवत, शर्मिला रेगे आणि त्यांच्या स्त्री-अभ्यासातील सहकाऱ्यांनी अथक प्रयत्न केले याची नोंद घेणे गरजेचे ठरेल. कारण या वाचन साहित्यात श्रम, लैंगिकता व पुनरूत्पादना संदर्भातील मार्क्सवादाच्या मर्यादा अधोरेखीत केल्या आहेत.

**संदर्भ**


१ बगाडे, उमेश, २०१७, वासाहतिक महाराष्ट्रातील शेतकरी संघर्षातील समूहभान, हरिती पब्लि., पुणे ५७.

२ घोगरे, राजकुमार 2018, https://m.facebook.com/story. php?story_fbid=1671648749526145&id= 100000431091004

३ पाटील, शरद, १९९३, मार्क्सवाद, फुले-आंबेडकरवाद, सुगावा प्रकाशन, पुणे-३०.

४ शुद्ध कल्चरल कॅपिटॅलिझम (स्लॅवोज झिजेक)

५ परदेशी, प्रतिमा, १९९६, डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती, सावित्रीबाई फुले प्रकाशन, पुणे.

६ O'bryan, Mary, 1983, The Politics of Reproduction, Routledge & Kegan Paul Boston, London and Henly- 1983

७ Rege, Sharmila, 2013, Against the Madness of Manu, Navayana publishing pvt.Ltd., New Delhi- 110049

८ Zizek, Slavoj, 2011, https://youtu.be/hlAMpQ8J7g